# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. २८/०१/२०१५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दिनांक २८/०१/२०१५ रोजी सभा सुचना क्र. १७ दि. २०/०१/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. प्रशांत एन. केळूसकर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रशांत एन. केळूसकर | सभापती |
| २. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ३. | सौ. मंदाकिनी गावंड | सदस्या |
| ४. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| ५. | श्री. अश्विन श्यामजी कासोदरीया | सदस्य |
| ६. | सौ. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ७. | श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा | सदस्य |
| ८. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ९. | श्री. नरेश तुकाराम पाटील | सदस्य |
| १०. | श्रीम. नयना म. वसाणी | सदस्या |
| ११. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| १२. | श्री. सुहास माधवराव रकवी | सदस्य |
| १३. | श्री. जयंतीलाल पाटील | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. परशुराम प. म्हात्रे | सदस्य |
| २. | श्री. हंसुकुमार कमलकुमार पांडे | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व सन्मा. सदस्य आपण आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडु या. हीच आपणाकडून अपेक्षा सचिव साहेब सभेला सुरुवात करा.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. २८/०१/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १७, दि. २०/०१/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**नयना वसाणी :-**

सचिव साहेब ''क'' खाली विषय आहे.

**नगरसचिव :-**

घ्यायचा आहे का?

**मा. सभापती :-**

हो.

**नगरसचिव :-**

शेवटी घेण्यात येईल. प्रकरण क्र. १३९, दि. ३१/१०/२०१४ व दि. ०९/१२/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**राजेंद्र जैन :-**

कॉपी देते है और जानकारी देते है। यह बात १० वे महिने की है और १० वे महिने के बाद में अभी तक कुछ संबंधीत ना लेटर है ना वर्बल कॉल है। आपने आश्वासन दिया। आप बिना तयारीके आते है। और आने के बाद आश्वासन देते हो वो भी झूटा आश्वासन देते हो। अगर आपने ऐसी कॉपी भेजी हो और मेरे को नही मिली हो अन्यथा मुझे जवाब नही चाहिए। मैं देशमूख साहब को नोट करने को बोलता हूँ कोई भी अधिकारी स्टँडिंग समिती के सदस्य को .......................

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य ज्या मागण्या करतात. त्या मागण्याची उत्तर देण्यात यावी.

**राजेंद्र जैन :-**

पेज नं. ३ पे बारकुंड साहब बहुत बडा टॉपीक है जो आपने पडा भी नहीं होगा। मैंने केबल डालने की परमिशन १०० टक्का ऐसी होती है की केबल बिलो द रोड जाए। आपने कहाँ था हो जाएगा जो केबल उपर है सब निचे हो जाऐंगे। अभी तक नहीं हुआ अगर काम हुआ है तो बताओ।

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो ३१ ऑक्टोबरला जरी आपण रिलायन्सवर...............

**राजेंद्र जैन :-**

इसमें आपने बोला हो जाएगा हुआ की नहीं।

**शिवाजी बारकुंड :-**

आजच्या घडीला पूर्ण झालेले नाही.

**राजेंद्र जैन :-**

आपने बोला है हो जाएगा कैसा होएगा?

**शिवाजी बारकुंड :-**

रिलायन्सने ह्या दोन्हीच्या बाबतीत ॲग्रीमेंट आणि केबल कलवर्टच्यावर बऱ्याच ठिकाणी शाळामध्ये तुमच्या वॉर्ड आणि शहरामध्ये सर्व ठिकाणी चर्चा झाली होती. त्याच्यावर रिलायन्स बरोबर मी स्वतः बैठक घेतलेली त्यांनी प्रॉमीस केले की आम्ही टप्प्या टप्प्याने पूर्ण मिरा भाईंदर मधील सर्व शहरात खालून घेतो आणि कलवर्टच्या मधून घेता येणार नाही.

**राजेंद्र जैन :-**

यह मैं ७ साल पहले की बात कर रहा हूँ। आप कौनसी बात कर रहे हो। कब मिटींग थी। उसका प्रोसेडिंग कहाँ है।

**शिवाजी बारकुंड :-**

हमारा ॲग्रीमेंट है। नगरपालिका से लेके आज तक ॲग्रीमेंट हुआ नही यह पहली बार ॲग्रीमेंट हुआ है। उसको टाईम जा रहा है। वो अंतिम ऐसा नहीं होगा।

**राजेंद्र जैन :-**

आपका बोलने का मतलब यह है की पहले केबल डाला था उसका वर्क ऑर्डर नही बनाया था।

**शिवाजी बारकुंड :-**

यह ग्रामपंचायत नगरपालिका से आ रहा है। उसमें अभी ॲग्रीमेंट करके सुधार ला रहे है।

**राजेंद्र जैन :-**

उसका पेपर वर्क क्या है?

**शिवाजी बारकुंड :-**

पेपर वर्क अपना स्टँन्डिंग कमिटी होने के बाद रिलायन्स के ऑफिसर को मैंने बुलाया था। हमारा डिस्कशन हुआ की पूरा मिरा भाईंदर में जितना स्ट्रिट लाईट और जो उपर केबल डाला है स्लॅब के उपर से जाता है वो सब केबल अंदर से जाना चाहिए। यह सब डिस्कशन हुआ।

**राजेंद्र जैन :-**

उन्होंने लिखके दिया क्या?

**शिवाजी बारकुंड :-**

नहीं। जो ॲग्रीमेंट में है उसमें वो बी.एम.सी. का रेट लगा रहे है। हमको बी.एम.सी. को रेट नहीं चाहिए। उसके बाद थोडी बात अटी उधर २०-२५ टक्का रेट जादा है। तो हम लोग बोल रहे है हमको वो रेट नहीं चाहिए। तो उसके उपर बात चल रहा है।

**राजेंद्र जैन :-**

दो विषय अलग-अलग है। एक डोमेस्टिक एक कर्मशियल रेट आ गया। केबल क्या करने का है। वह सेप्रेट इश्यू हो गया। केबल लाईन का काम हो चूका है। आपने टेंडर दिया है।

**शिवाजी बारकुंड :-**

जो केबल उपर से गया है उनको स्लॅब के निचे से डालेंगे।

**राजेंद्र जैन :-**

इसमे आपने बोला जो केबल रोड के उपर है वह निचे हो जाऐंगे। अभी तीन महिने बाद देखा तो आपने टेक्नीकल पॉइन्ट निकाला। आपको कहीन कही जिम्मेदारी लेनी पडेगी। अभी यह काम कितने दिन में हो जाएगा। इसको टाईम लिमिट लगेगा।

**शिवाजी बारकुंड :-**

इसका टाईम लिमिट नहीं बता सकते।

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची पूर्तता होत नसेल तर त्यांना वेळोवेळी पत्राने कळवत जा.

**नयना वसाणी :-**

दि. ३१/१०/२०१४ व दि. ०९/१२/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १३९ :-**

दि. ३१/१०/२०१४ व दि. ०९/१२/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १३३ :-**

दि. ३१/१०/२०१४ व दि. ०९/१२/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- डॉ. नयना वसाणी** **अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४०, नागरी आपत्ती धोके निवारण कार्यक्रम. (फेरसादर)

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत व राज्य शासनाच्या शहर आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमाअंतर्गत मिरा भाईंदर शहरात “नागरी आपत्ती धोके निवारण कार्यक्रम” राबविण्याकरिता इच्छुक व तज्ञ व्यक्तींच्या संस्थाकडून Online E-Tendering पध्दतीने फेर निविदा दि. ०५/०३/२०१४ रोजी, दै. संध्यानंद व दै. मुंबई चौफेर वृत्तपत्रातून प्रसिध्द करून मे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट व मे. लोणार फाउडेशन यांनी निविदा सादर केल्या होत्या. त्यानुसार त्यांचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला.

दि. १३/०८/२०१४ रोजी, निविदा निवड समितीने उपरोक्त निविदाकारांच्या कागदपत्रांची तपासणी केली असता, प्राप्त दोन निविदेपैकी मे. गणेश कृपा ट्रान्सपोट यांनी निविदेतील कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांची तांत्रिक निविदा पात्र होत आहे. तसेच मे. गणेशकृपा ट्रान्सपोर्ट त्यांचा दराचा लिफाफा उघडणेस निविदा निवड समितीने मान्यता दिली. दि. २२/०८/१४ रोजी मे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट यांचा दराचा लिफाफा उघडण्यात आला. निविदाकाराने दिलेल्या दरामध्ये वाटाघाटी करणे कामी दि. २२/०८/२०१४ रोजी निविदा निवड समिती यांच्या उपस्थितीत निविदाकाराने निविदेत सादर केलेल्या दरात वाटाघाटी करून दर कमी करण्याचे मान्य केले. तसेच सिस्टिम मॅनेजर, संगणक विभाग यांचेकडील जा.क्र.मनपा/१२०/१४-१५, दि. ११/११/२०१४ रोजीच्या पत्रानुसार खालीलप्रमाणे वाटाघाटीनंतरचे दर वाजवी असल्याबाबत कळविण्यात आले आहे.

**१) आपत्ती नियंत्रण कक्षाचे बळकटीकरण (शहर आपत्ती नियंत्रण कक्ष प्रस्थापित करणे)**

| Sr. No. | ITEM NAME | | DESCRIPTION | Ganesh Transport Tender | Ganesh Transport After Negotiation | MBMC | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Computer System | | | Per Unit Rate | Per Unit Rate | Required Qty | Net Amount |
| | a) | Server Configuration | IBM X3100 M4 Server<br>Intel Xeon Processor E3-1220v2 CPU (Quad Core),<br>3.1GHz / 1600MHz / 8 MB Memory 1X8 GB<br>Open Bay 2.5 Hot Swap SAS / SATA<br>Multi Burner, RAID 01 in built (SR M1015) + Add RPS Capable Model<br>Dell LED Monitor 18 inches<br>Dell Keyboard & Mouse, | 138,000 | 1,03,450 | 1 | 1,03,450 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Windows 2008 Server Edition | Operating System<br>MS Windows Server 2012 1 no.<br>Windows Office Std. 2013 6 no.<br>Calc & Terminal access Licenses 5 no.<br><br>Thin Client Dual Display Support | 46,000 X 6 = 2,76,000 | 2,36,400 | 1 no.<br>6 no.<br>5 no. | 2,36,400 |
| | b) | Nodes (Thin client) | Itona F27 – F9R7<br>8 GB Flash, 2GB RAM, Dual Monitor supoort<br>VIA nano U3300 1.2 GHz, Chipset: VX900<br>Port : 2 X Serial port, 2 X PS/2, 2.0 ports, VGA, DVI<br>Security : Kensington Lock Rewady Remote management : XI<br>Manage, Network : 10/100/1000/ Ethernet stereo sound<br>Graphics : VGA : 2048 *1536 & DVI – 1920 X 1200 | 26,450 | 22,800 | 5 | 1,14,000 |
| | | | Dell LED Monitor 22 inches<br>Dell Keyboard & Mouse | 17,250 | 15,800 | 10 | 1,58,000 |
| | C) | Net working switch board L2 Giga Port | Net working PRO-7224 Layer 2 Giga Port | 50,600 | 40,000 | 1 | 40,000 |
| | d) | Net working & Cabling | Net working & Cabling<br>Wall Mount Server Rack,<br>Network Cabling with Capping,<br>Pulling, Crimping & Patching Charges,<br>Core and Point Testing Included,<br>Cable Dressing and Rack Installation | 96,025 | 92,000 | 1 | 92,000 |
| | e) | HP Laser All in one color printer (+ | HP Printer - HP MFP M 177 Color Laser Printer + | 73,025 | 61,000 | 1 | 61,000 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Additional 1 Cartridge) | Additional 1 Cartridge | | | | |
| | | HP Laser jet Black and White Printer (+ Additional 1 Cartridge) | Hp mono printer<br>Additional 1 Cartridge | 13,225 | 10,670 | 1 | 10,670 |
| | | | NAS Backup Drive – 2TB<br>With 2 SATA Bays & Upgradable to 8 TB, RAID Support | 63,250 | 40,600 | 1 | 40,600 |
| | G) | UPS | UPS to support Server, Nodes, Printers Switches (With Battery Backup) | 402,500 | 3,00,000 | 1 | 3,00,000 |
| | H) | Firewall | Cyber Roam Firewall | 57,500 | 55,000 | 1 | 55,000 |
| 2 | Software for Disaster Management For eg. Previstar - CPS - DSS | | For eg. Previstar - CPS - DSS | 747,500 | 746,500 | 1 | 746,500 |
| 3 | Brief information about City to Fill up in Software | | As per technical bid point no 10.2 | 230,000 | 228,000 | 1 | 228,000 |
| 4 | Generator /DG Set | | 5 KV, (Portable) Petrol Staring, Kerosene run Continuous Running – 6 to7 Hours Make - Honda | 149,500 | 148,000 | 1 | 148,000 |
| 5 | Staff Uniform | | T-Shirts, Pant, Shoes<br>• Good Quality Tshirt with MBMC given color combination. In Front Color printed MBMC Logo & In Back Given text in BW.<br>• Cotton mix pant with plates, 6 Pockets (color will be given later) | 1,380 | 1,270 | 20 | 25,400.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | • Genuine Later Safety anklet shoes with 200 J wide Toe Cap, Slip Resistant, Anti Static, TPU + PU Sole, CE Marked | | | | |
| 6 | **Portable Training Kit** | | | | | |
| | a) Folding Stretcher | Portable Hacking Stretcher | 6,325 | 6,250 | 2 | 12,500.00 |
| | b) Fire Blanket | Asbestos Blanket | 2,300 | 2,200 | 2 | 4,400.00 |
| | c) Fire Extinguisher (ABC/ Co2/ Water type/ BC) 5 KG / 9 Ltr. | 5 kg ABC Type<br>5 kg DCP Type<br>4.5 kg Co2 Type<br>3.2 kg Co2 Type<br>9 Ltr. Water Type | 3,450 | 3,300 | 6 | 19,800.00 |
| | d) Fire Extinguisher - Cartridge | Weight<br>60 gm<br>120 gm<br>200 gm | 173 | 160 | 25 | 4,000.00 |
| | e) DLP Projector With Projector Screen | LG – BG630 Projector | 63,250 | 54,000 | 1 | 54,000 |
| | f) Lenovo Laptop | Core i3 Processor, 2 GB RAM, 500 GB HDD, DVD Writer, 15.6” Screen, LAN, Wi-Fi, Webcam, BT, Sound and Mike support | 40,250 | 36,000 | 1 | 36,000 |
| 7 | **VHF Set (Motorola)** | | | | | |
| | Repeater | Motorola CDR 700 with standard accessories | 132,221 | 131,000 | 1 | 131,000.00 |
| | Base station – Anelog | Motorola GM 338 with standard accessories | 35,621 | 34,500 | 2 | 69,000.00 |
| | Mobile Station – Anelog | Motorola GM 338 with standard accessories | 30,791 | 30,000 | 3 | 90,000.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Portable Handheld - Anelog | Motorola GM 328 with standard accessories | 23,546 | 23,000 | 5 | 115,000.00 |
| | Installation, Programming & Commissioning of network | Installation, Programming & Commissioning of VHF network in MBMC Jurisdiction | 57,500 | 57,000 | 1 | 57,000.00 |
| | On site training for all equipments & networks | On site training for all VHF equipments & networks provide to VHF Operator. | 28,750 | 28,000 | 1 | 28,000.00 |
| | Binding facility | For VHF Network Licensing Coordination | 115,000 | 110,000 | 1 | 110,000.00 |

## २) प्रशिक्षण कार्यक्रम :

| अ. क्र | प्रशिक्षणाचा विषय | लाभार्थी | प्रशिक्षण कालावधी / दिवस | एकुण कार्यक्रम | प्रती कार्यक्रम प्रशिक्षणार्थी | एकुण लाभार्थी प्रशिक्षणार्थी | मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट दर (प्रती व्यक्ती) | मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट वाटाघाटी नंतरचे दर (प्रती व्यक्ती) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रथमोपचार - बेसीक | कर्मचारी, अधिकारी, स्वयंसेवक | १ दिवस | २ | १०० | २०० | | |
| २ | प्रथमोपचार - ॲडवान्स | कर्मचारी, अधिकारी, स्वयंसेवक | १ दिवस | २ | ५० | १०० | | |
| ३ | अग्निशमन - बेसीक | कर्मचारी, अधिकारी, स्वयंसेवक | १ दिवस | २ | १०० | २०० | | |
| ४ | अग्निशमन - ॲडवान्स | कर्मचारी, अधिकारी, स्वयंसेवक | १ दिवस | २ | ५० | १०० | | |
| ५ | आपत्ती व्यवस्थापन आणि IRS | अधिकारी, एनजीओचे पदाधिकारी | २ दिवस | २ | १०० | २०० | | |
| ६ | आपत्ती व्यवस्थापन कायदा व केंद्र शासनाचे मार्गदशक निर्देश (Guideline) | कर्मचारी, अधिकारी, एनजीओचे पदाधिकारी | १ दिवस | २ | १०० | २०० | | |
| ७ | आपत्ती नियंत्रण कक्ष व सहयोगी संस्था (EOC & ESF) | कर्मचारी, अधिकारी, | १ दिवस | २ | १०० | २०० | 700 | 650 |
| ८ | भारतीय हवामान खातेची कामकाज पध्दती | कर्मचारी, अधिकारी, | १ दिवस | २ | १०० | २०० | | |
| ९ | औद्योगीक आपत्ती व्यवस्थापन | कर्मचारी, अधिकारी, एनजीओचे पदाधिकारी, कंपन्याचे अधिकारी | १ दिवस | २ | १०० | २०० | | |
| १० | आपत्तकालीन कमांड व कम्युनिकेशन | कर्मचारी, अधिकारी, एनजीओचे पदाधिकारी | १ दिवस | २ | १०० | २०० | | |
| ११ | आपत्तकालीन तात्काळ बाहेर पडण्याचे नियोजन (Evacuation | कर्मचारी, अधिकारी, एनजीओचे | १ दिवस | २ | १०० | २०० | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Planning) (Mock Drill) | पदाधिकारी, स्वयसेवक | | | | | | |
| १२ | आपत्तीची रंगीत तालीम (Mock Drill) | कर्मचारी, अधिकारी, एनजीओचे पदाधिकारी, स्वयंसेवक | १ दिवस | २ | १०० | २०० | | |
| १३ | आपत्ती व्यवस्थापन आणि IRS | नगरसेवक व आमदार | १ दिवस | १ | २०० | २०० | | |
| | | **एकुण** | २७ दिवस | २५ | | २४०० | | |

**३) जनजागृती कार्यक्रम :**

| अ.क्र. | विवरण | एकुण संख्या | युनिट (एक) | मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट **दर** | मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|---|---|---|
| १. | आपत्ती व्यवस्थापन संबधीत लघूपट केबलवर व गर्दीच्या ठिकाणी दाखविण्या करीता आपती व्यवस्थापन संबधीत लघूपट बनविणे | १ | शालेय सुरक्षितता व आपती व्यवस्थापन विषयावर लघूपट | २००००० | १९५००० |
| २. | जास्तीत जास्त लोकापर्यत पोहचण्या करीता आपत्तीत काय करावे व काय करु नये यांचे विविध विषयावरील पत्रिका (pamphlets) बनवणे. | १,००,००० | प्रति १००० | १५०० | १४०० |
| ३. | फ्लेक्स शिट होर्डिंग बोर्ड लावणे (शाळा व सार्वजनिक ठिकाणी मध्ये साईज 4‘ x 6‘ फिट लाकडी फ्रेम सह. | १५० | प्रति बोर्ड | १२०० | ११०० |
| ४. | बसमध्ये, नोटीस बोर्ड वगैरे ठिकाणी प्रथमदर्शनी दिसणारे रंगीत पोस्टर्स तयार करणे व छापणे भूकंप, पूर, वीज, आग व बॉम्ब स्फोट वगैरे साईज A4 - with sticker | १०,००० | प्रति एक हजार | २३००० | २२५०० |
| ६. | रंगीत तालिम (मॉक, पुर, भुकंप, आग इत्यादी आपत्ती वर) | १० ठिकाणे | प्रति रंगीत तालिम | २१००० | २०००० |

वरील तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता, संगणक विभागाने तपासून नमूद केलेली कनफीगरेशन नुसार संगणकप्रणाली बसवून घ्यावी. याची संपूर्ण जबाबदारी संगणक विभागाची राहील. मे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट यांनी वाटाघाटीनंतर सादर केलेले दर हे वाजवी असल्याने वाटाघाटी नंतर प्राप्त दराच्या निविदेस ही मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय पिछली बार चर्चा हुई थी इसमें पिछले मिटींग की प्रोसेडिंग आनी चाहिए। उसमे मैंने रेट्स का ऑब्जेक्शन लिया था।

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १४० :-**

नागरी आपत्ती धोके निवारण कार्यक्रम. (फेरसादर)

**ठराव क्र. १३४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत व राज्य शासनाच्या शहर आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमाअंतर्गत मिरा भाईंदर शहरात ‘‘नागरी आपत्ती धोके निवारण कार्यक्रम’’ राबविण्याकरिता इच्छुक व तज्ञ व्यक्तींच्या संस्थाकडून Online E-Tendering पध्दतीने फेर निविदा दि. ०५/०३/२०१४ रोजी, दै. संध्यानंद व दै. मुंबई चौफेर वृत्तपत्रातून प्रसिध्द करून मे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट व मे. लोणार फाउडेशन यांनी निविदा सादर केल्या होत्या. त्यानुसार त्यांचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला.

दि. १३/०८/२०१४ रोजी, निविदा निवड समितीने उपरोक्त निविदाकारांच्या कागदपत्रांची तपासणी केली असता, प्राप्त दोन निविदेपैकी मे. गणेश कृपा ट्रान्सपोट यांनी निविदेतील कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांची तांत्रिक निविदा पात्र होत आहे. तसेच मे. गणेशकृपा ट्रान्सपोर्ट त्यांचा दराचा लिफाफा उघडणेस निविदा निवड समितीने मान्यता दिली. दि. २२/०८/१४ रोजी मे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट यांचा दराचा लिफाफा उघडण्यात आला. निविदाकाराने दिलेल्या दरामध्ये वाटाघाटी करणे कामी दि. २२/०८/२०१४ रोजी निविदा निवड समिती यांच्या उपस्थितीत निविदाकाराने निविदेत सादर केलेल्या दरात वाटाघाटी करून दर कमी करण्याचे मान्य केले. तसेच सिस्टिम मॅनेजर, संगणक विभाग यांचेकडील जा.क्र.मनपा/१२०/१४-१५, दि. ११/११/२०१४ रोजीच्या पत्रानुसार खालीलप्रमाणे वाटाघाटीनंतरचे दर वाजवी असल्याबाबत कळविण्यात आले आहे.

**२) आपत्ती नियंत्रण कक्षाचे बळकटीकरण (शहर आपत्ती नियंत्रण कक्ष प्रस्थापित करणे)**

| Sr. No. | ITEM NAME | | DESCRIPTION | Ganesh Transport Tender | Ganesh Transport After Negotiation | MBMC | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **Computer System** | | | Per Unit Rate | Per Unit Rate | Required Qty | Net Amount |
| | a) | Server Configuration | IBM X3100 M4 Server<br>Intel Xeon Processor E3-1220v2 CPU (Quad Core),<br>3.1GHz / 1600MHz / 8 MB Memory 1X8 GB<br>Open Bay 2.5 Hot Swap SAS / SATA<br>Multi Burner, RAID 01 in built (SR M1015) + Add RPS Capable Model<br>Dell LED Monitor 18 inches<br>Dell Keyboard & Mouse, | 138,000 | 1,03,450 | 1 | 1,03,450 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Windows 2008 Server Edition | Operating System<br>MS Windows Server 2012 1 no.<br>Windows Office Std. 2013 6 no.<br>Calc & Terminal access Licenses 5 no.<br><br>Thin Client Dual Display Support | 46,000 X 6 = 2,76,000 | 2,36,400 | 1 no.<br>6 no.<br>5 no. | 2,36,400 |
| | b) | Nodes (Thin client) | Itona F27 – F9R7 | 26,450 | 22,800 | 5 | 1,14,000 |
| | | | 8 GB Flash, 2GB RAM, Dual Monitor supoort | | | | |
| | | | VIA nano U3300 1.2 GHz, Chipset: VX900 | | | | |
| | | | Port : 2 X Serial port, 2 X PS/2, 2.0 ports, VGA, DVI | | | | |
| | | | Security : Kensington Lock Rewady Remote management : XI | | | | |
| | | | Manage, Network : 10/100/1000/ Ethernet stereo sound | | | | |
| | | | Graphics : VGA : 2048 *1536 & DVI – 1920 X 1200 | | | | |
| | | | | 17,250 | 15,800 | 10 | 1,58,000 |
| | | | Dell LED Monitor 22 inches | | | | |
| | | | Dell Keyboard & Mouse | | | | |
| | C) | Net working switch board L2 Giga Port | Net working PRO-7224 Layer 2 Giga Port | 50,600 | 40,000 | 1 | 40,000 |
| | d) | Net working & Cabling | Net working & Cabling | 96,025 | 92,000 | 1 | 92,000 |
| | | | Wall Mount Server Rack, | | | | |
| | | | Network Cabling with Capping, | | | | |
| | | | Pulling, Crimping & Patching Charges, | | | | |
| | | | Core and Point Testing Included, | | | | |
| | | | Cable Dressing and Rack Installation | | | | |
| | e) | HP Laser All in one color printer (+ Additional 1 Cartridge) | HP Printer - HP MFP M 177 Color Laser Printer + Additional 1 Cartridge | 73,025 | 61,000 | 1 | 61,000 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | HP Laser jet Black and White Printer (+ Additional 1 Cartridge) | Hp mono printer<br>Additional 1 Cartridge | 13,225 | 10,670 | 1 | 10,670 |
| | | | NAS Backup Drive – 2TB<br>With 2 SATA Bays & Upgradable to 8 TB, RAID Support | 63,250 | 40,600 | 1 | 40,600 |
| | G) | UPS | UPS to support Server, Nodes, Printers Switches (With Battery Backup) | 402,500 | 3,00,000 | 1 | 3,00,000 |
| | H) | Firewall | Cyber Roam Firewall | 57,500 | 55,000 | 1 | 55,000 |
| 2 | Software for Disaster Management For eg. Previstar - CPS - DSS | | For eg. Previstar - CPS - DSS | 747,500 | 746,500 | 1 | 746,500 |
| 3 | Brief information about City to Fill up in Software | | As per technical bid point no 10.2 | 230,000 | 228,000 | 1 | 228,000 |
| 4 | Generator /DG Set | | 5 KV, (Portable) Petrol Staring, Kerosene run Continuous Running – 6 to7 Hours Make - Honda | 149,500 | 148,000 | 1 | 148,000 |
| 5 | Staff Uniform | | T-Shirts, Pant, Shoes<br>• Good Quality Tshirt with MBMC given color combination. In Front Color printed MBMC Logo & In Back Given text in BW.<br>• Cotton mix pant with plates, 6 Pockets (color will be given later)<br>• Genuine Later Safety anklet shoes with 200 J wide Toe Cap, Slip Resistant, Anti Static, TPU + PU Sole, CE Marked | 1,380 | 1,270 | 20 | 25,400.00 |
| 6 | **Portable Training Kit** | | | | | | |
| | a) Folding Stretcher | | Portable Hacking Stretcher | | | 2 | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 6,325 | 6,250 | | 12,500.00 |
| | b) Fire Blanket | Asbestos Blanket | 2,300 | 2,200 | 2 | 4,400.00 |
| | c) Fire Extinguisher (ABC/ Co2/ Water type/ BC) 5 KG / 9 Ltr. | 5 kg ABC Type<br>5 kg DCP Type<br>4.5 kg Co2 Type<br>3.2 kg Co2 Type<br>9 Ltr. Water Type | 3,450 | 3,300 | 6 | 19,800.00 |
| | d) Fire Extinguisher - Cartridge | Weight<br>60 gm<br>120 gm<br>200 gm | 173 | 160 | 25 | 4,000.00 |
| | e) DLP Projector With Projector Screen | LG – BG630 Projector | 63,250 | 54,000 | 1 | 54,000 |
| | f) Lenovo Laptop | Core i3 Processor, 2 GB RAM, 500 GB HDD, DVD Writer, 15.6" Screen, LAN, Wi-Fi, Webcam, BT, Sound and Mike support | 40,250 | 36,000 | 1 | 36,000 |
| 7 | **VHF Set (Motorola)** | | | | | |
| | Repeater | Motorola CDR 700 with standard accessories | 132,221 | 131,000 | 1 | 131,000.00 |
| | Base station – Anelog | Motorola GM 338 with standard accessories | 35,621 | 34,500 | 2 | 69,000.00 |
| | Mobile Station – Anelog | Motorola GM 338 with standard accessories | 30,791 | 30,000 | 3 | 90,000.00 |
| | Portable Handheld - Anelog | Motorola GM 328 with standard accessories | 23,546 | 23,000 | 5 | 115,000.00 |
| | Installation, Programming & Commissioning of network | Installation, Programming & Commissioning of VHF network in MBMC Jurisdiction | 57,500 | 57,000 | 1 | 57,000.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | On site training for all equipments & networks | On site training for all VHF equipments & networks provide to VHF Operator. | 28,750 | 28,000 | 1 | 28,000.00 |
| | Binding facility | For VHF Network Licensing Coordination | 115,000 | 110,000 | 1 | 110,000.00 |

## २) प्रशिक्षण कार्यक्रम :

| अ. क्र | प्रशिक्षणाचा विषय | लाभार्थी | प्रशिक्षण कालावधी / दिवस | एकुण कार्यक्रम | प्रती कार्यक्रम प्रशिक्षणार्थी | एकुण लाभार्थी प्रशिक्षणार्थी | मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट दर (प्रती व्यक्ती) | मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट वाटाघाटी नंतरचे दर (प्रती व्यक्ती) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रथमोपचार - बेसीक | कर्मचारी, अधिकारी, स्वयंसेवक | १ दिवस | २ | १०० | २०० | 700 | 650 |
| २ | प्रथमोपचार - ॲडवान्स | कर्मचारी, अधिकारी, स्वयंसेवक | १ दिवस | २ | ५० | १०० | | |
| ३ | अग्निशमन - बेसीक | कर्मचारी, अधिकारी, स्वयंसेवक | १ दिवस | २ | १०० | २०० | | |
| ४ | अग्निशमन - ॲडवान्स | कर्मचारी, अधिकारी, स्वयंसेवक | १ दिवस | २ | ५० | १०० | | |
| ५ | आपत्ती व्यवस्थापन आणि IRS | अधिकारी, एनजीओचे पदाधिकारी | २ दिवस | २ | १०० | २०० | | |
| ६ | आपत्ती व्यवस्थापन कायदा व केंद्र शासनाचे मार्गदशक निर्देश (Guideline) | कर्मचारी, अधिकारी, एनजीओचे पदाधिकारी | १ दिवस | २ | १०० | २०० | | |
| ७ | आपत्ती नियंत्रण कक्ष व सहयोगी संस्था (EOC & ESF) | कर्मचारी, अधिकारी, | १ दिवस | २ | १०० | २०० | | |
| ८ | भारतीय हवामान खातेची कामकाज पध्दती | कर्मचारी, अधिकारी, | १ दिवस | २ | १०० | २०० | | |
| ९ | औद्योगीक आपत्ती व्यवस्थापन | कर्मचारी, अधिकारी, एनजीओचे पदाधिकारी, कंपन्याचे अधिकारी | १ दिवस | २ | १०० | २०० | | |
| १० | आपत्तकालीन कमांड व कम्युनिकेशन | कर्मचारी, अधिकारी, एनजीओचे पदाधिकारी | १ दिवस | २ | १०० | २०० | | |
| ११ | आपत्तकालीन तात्काळ बाहेर पडण्याचे नियोजन (Evacuation Planning) (Mock Drill) | कर्मचारी, अधिकारी, एनजीओचे पदाधिकारी, स्वयसेवक | १ दिवस | २ | १०० | २०० | | |
| १२ | आपत्तीची रंगीत तालीम (Mock Drill) | कर्मचारी, अधिकारी, एनजीओचे पदाधिकारी, स्वयंसेवक | १ दिवस | २ | १०० | २०० | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | आपत्ती व्यवस्थापन आणि IRS | नगरसेवक व आमदार | १ दिवस | १ | २०० | २०० | | |
| | | **एकुण** | २७ दिवस | २५ | | २४०० | | |

**३) जनजागृती कार्यक्रम :**

| अ.क्र. | विवरण | एकूण संख्या | युनिट (एक) | मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट **दर** | मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|---|---|---|
| १. | आपत्ती व्यवस्थापन संबधीत लघूपट केबलवर व गर्दीच्या ठिकाणी दाखविण्या करीता आपती व्यवस्थापन संबधीत लघूपट बनविणे | १ | शालेय सुरक्षितता व आपती व्यवस्थापन विषयावर लघूपट | २००००० | १९५००० |
| २. | जास्तीत जास्त लोकापर्यत पोहचण्या करीता आपत्तीत काय करावे व काय करु नये यांचे विविध विषयावरील पत्रिका (pamphlets) बनवणे. | १,००,००० | प्रति १००० | १५०० | १४०० |
| ३. | फ्लेक्स शिट होर्डिंग बोर्ड लावणे (शाळा व सार्वजनिक ठिकाणी मध्ये साईज 4‘ x 6‘ फिट लाकडी फ्रेम सह. | १५० | प्रति बोर्ड | १२०० | ११०० |
| ४. | बसमध्ये, नोटीस बोर्ड वगैरे ठिकाणी प्रथमदर्शनी दिसणारे रंगीत पोस्टर्स तयार करणे व छापणे भूकंप, पूर, वीज, आग व बॉम्ब स्फोट वगैरे साईज A4 - with sticker | १०,००० | प्रति एक हजार | २३००० | २२५०० |
| ६. | रंगीत तालिम (मॉक, पुर, भुकंप, आग इत्यादी आपत्ती वर) | १० ठिकाणे | प्रति रंगीत तालिम | २१००० | २०००० |

वरील तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता, संगणक विभागाने तपासून नमूद केलेली कनफीगरेशन नुसार संगणकप्रणाली बसवून घ्यावी. याची संपूर्ण जबाबदारी संगणक विभागाची राहील. मे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट यांनी वाटाघाटीनंतर सादर केलेले दर हे वाजवी असल्याने वाटाघाटी नंतर प्राप्त दराच्या निविदेस ही मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर** **अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४१, पुर्नविनियोजन प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत. (फेरसादर) (लेखा विभाग)

**नयना वसाणी :-**

मा. सभापती महोदय आपण मागच्या मिटींगला डिस्कशन केलेले होत की ज्यावेळेस स्टँन्डिंगची मिटींग लागेल तेव्हा प्रत्येक प्रभाग अधिकारी इकडे असणार. मला मा. आयुक्तांना विचारायचे आहे की तुम्ही कोणाला प्रायर परमिशन दिलेली असेल कोर्टात वैगेरे जायला तर त्यांचे आम्हाला नाव सांगा. कोण तुमच्या परवानगीने ॲबसेन्ट आहेत आणि कोण असेच ॲबसेन्ट आहेत. कोणकोणते प्रभाग अधिकारी इथे आहेत.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

शिरवळकरकडे दोन प्रभाग आहेत बोरसे आहेत, राणे आहेत.

**नयना वसाणी :-**

खेत्रे साहेब कुठे आहेत.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

खेत्रे कुठे परमिशन घेऊन गेले नाहीत त्यांनी कोणतीही परवानगी घेतली नाही.

**नयना वसाणी :-**

मग काय करायचे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

कारणे दाखवा नोटिस देऊन खुलासा घेतो. त्यांनी निश्चितपणे उपस्थित राहणे गरजेचे होते.

**मा. सभापती :-**

सदर विषय मागे घेतला आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४२, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करावयाच्या कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**नयना वसाणी :-**

राज्य शासनाच्या नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रातील अनुसुचित जाती तसेच नवबौध्दांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसुचित जातीच्या राखीव प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीमधील अनुसुचित जाती व नवबौध्द विशेष घटक यांची लोकसंख्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक आहे. अशा वस्त्यांमध्ये शासन निर्णय क्र. विधायो/१०२०/१५९२/प्र.क्र.१८९/नवि-४, मंत्रालय मुंबई, दि. ०५/०३/२००२ च्या शासन निर्णयानुसार नागरी सुविधा विषयक कामे हाती घेता येतात. सदर योजनेच्या कामासाठी १०० टक्के अनुदान शासनाकडून प्राप्त होत असून मा. जिल्हाधिकारी यांचेमार्फत कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येते. मिरा भाईंदर महानगरपालिकामार्फत सदर योजनेअंतर्गत करावयाच्या नागरी सुविधा विषयक कामाची अनुसुचित जातीकरीता आरक्षित असलेल्या प्रभागातून खालीलप्रमाणे कामे प्रस्तावित करण्यात येत आहे. अ.क्र. १ ते १८ पर्यंत वरील कामांमध्ये नागरी सुविधा देण्याच्या दृष्टीने म्हणजे शौचालय, वाचनालय, आरोग्य केंद्र वगैरे बांधण्याचे प्रस्तावित केलेले नाहीत. तरी सदर बाबतची महत्वाची कामे घेतल्यानंतर हा विषय फेरसादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय यह सारा जो निधी है ६ करोड का यह सारा प्रभाग क्र. २७ में लगाया गया है। इसके अलावा किधर नही लगाया जा सकता क्या?

**मा. सभापती :-**

नागरी वस्ती फंड जो आहे दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत त्याची थोडक्यात माहिती द्या की हा फंड कुठे वापरता येईल आणि ह्याचे कारण काय?

**दिपक खांबित :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो, नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत जो निधी आहे हा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रातील अनुसुचित जाती तसेच नवबौध्दासाठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये आपल्याकडे हा एकच प्रभाग आहे. प्रभाग क्र. २७ अनिता परमार मॅडम त्या वॉर्डच्या नगरसेविका आहेत. आपण इतर ठिकाणी काम घेऊ शकतो. पण त्या वस्त्यामध्ये अनुसुचित जाती नवबौध्दाची संख्या ५० टक्केपेक्षा जास्त असायला पाहिजे असे आपल्याकडे दुसरे कुठे नाही आहे.

**नयना वसाणी :-**

अगर किसी प्रभाग में ५० टक्के जादा है तो हम उधर कर सकते है। ऐसा ही है क्या इसमें खाली रस्ता और नाला बांधना है और कोई काम नहीं करना।

**दिपक खांबित :-**

जी.आर है उसके हिसाब से है।

**नयना वसाणी :-**

जी.आर में शौचालय वाचनालय नागरी सुविधा के अंतर्गत नही आता। खाली गटर और रस्ते आते है क्या? यह तो बहुत इम्पॉरटन्ट है आप उनको शौचालय दो। खाली गटर और रस्ते ही है क्या?

**दिपक खांबित :-**

ज्या प्रभागामध्ये जी कामाची आवश्यकता आहे.

**नयना वसाणी :-**

तिकडे शौचालयाची आवश्यकता नाही का?

**दिपक खांबित :-**

आहे ना. पण तिकडे जागा नाही. जागा जी आहे ती सॉल्ट डिपार्टमेंटची आहे. आम्ही प्रयत्न करतो. आमदार साहेबांनी आमदार निधीपण दिलेला आहे. गांधीनगर इथे शौचालय बांधण्याकरिता बाकीच्या तिकडे जागाच नाही. म्हणून आपण रस्ते आणि गटाराशिवाय करु शकत नाही.

**नयना वसाणी :-**

तरी आपण थोडासा विचार करुन घ्यावा.

**दिपक खांबित :-**

स्थानिक नगरसेवकाशी चर्चा करुन जी मागणी केली तीच काम आपण प्रस्तावित केली.

**नयना वसाणी :-**

ठीक आहे पण अजून कुठे जागा असेल आपल्याला त्यांना जास्त सुविधा देता येत असेल. तर फेरसादर करायला काय हरकत आहे.

**सुहास रकवी :-**

मा. सभापती महोदय, हा दलित वस्ती फंड दलिताच्या उध्दाराकरिता स्पेशल तो शासनाचा निर्णय आहेच पण आपण तिकडे दरवर्षी फंड यूज करतो. त्याच्या माध्यमातून इतर ठिकाणी पण कमी जास्त संस्था दलितांची किंवा मागासवर्गीयांची असेल तर तिकडे तो डायवर्ट करता येईल का? थोडासा प्रयत्न केला तरी चालेल. ह्याच माध्यमातून आपला काशिमिरा रोड सर्व्हिस रोडचे जे आहे ते सुध्दा काही प्रश्न असेच प्रलंबित आहेत. काही लोकांनी सर्व्हिस रोडच्या जागा सोडल्या आहेत त्याही पूर्ण केलेल्या नाहीत. हायकोर्टामध्ये आपला एफिडेव्हीट दिलेला आहे. त्या एफिडेव्हीटनुसार तो सर्व्हिस रोड बांधणे बंधनकारक आहे आणि आपण किती वेळात बांधणार आहोत त्या सगळ्या जागा कशा ताब्यात घेणार आहोत त्याचा खुलासा करावा. सर्व्हिस रोड कधी होतील अनेक वेळेला काय होते जे फंड असतात ते यूज आणि यूटीलाइज करतो. पण ते कुठे करावे त्याच्या करिता शासनाला पण विनंती केली की ह्याच्यातले काही पर्सेन्टेज दुसरीकडे वळवतो आला तर तो एक प्रयत्न तुम्ही करुन बघा.

**नयना वसाणी :-**

काही वेळेला गरज नसताना आपण एका प्रभागामध्ये रियूज करत राहतो.

**सुहास रकवी :-**

तो जो प्रभाग आहे तो छोटा आहे. २७ नं. वॉर्ड बघितला मुर्धा आलेले आहे. खांबित साहेब तिकडच्या लोकांना विचारुन करतात. तो त्याचा वैयक्तिक प्रश्न नाही. पण त्या माध्यमातून दुसरीकडे वळवता आला तर प्रयत्न करा अशी विनंती.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

माझी अशी विनंती आहे दलित वस्तीच्या कामाला प्रशासकीय मंजूरी जिल्हाधिका-याची आहे. आपल्याला जे सुचवायचे आहे ते स्पेसिफिक सुचवल गेल ते ठरावामध्ये आल तर तातडीने तशा प्रकारची सुधारणा करुन आपली मंजूरी घेऊन जिल्हाधिका-याकडे पाठवता येईल. अदर व्हाइज त्याला मार्चचे बंधन राहील. तुम्ही ते त्यांना दोन दिवसात द्या की आपण शौचालय घेऊ शकतो असे काही नाही की रस्त्यात घेतला पाहिजे.

**सुहास रकवी :-**

त्याचे म्हणणे आहे की मार्चच्या आत तो निधी वापरला गेला पाहिजे. हे ही बंधनकारक असते.

**मा. सभापती :-**

मी त्यांना सांगितले सुचना त्याच्यात घ्या.

**सुहास रकवी :-**

सुचनेसह मंजूर करावे अशी विनंती.

**मा. सभापती :-**

आपण जागेची पाहणी करुन घेऊ या. २-३ दिवसात करु या.

**प्रभात पाटील :-**

घोडबंदर आणि चेना. चेन्यामध्ये व्हिजीटर आणि शुटींग कायम चालू असतात. परंतु गावातल्या बायकांचे उघड्यावर चाललेल असते. त्यांनाही खूप लाजीरवाणे होते पण त्यांच्याकडे काही पर्याय नाही. मी स्वतःच्या डोळ्यांनी बघितलेली गोष्ट सांगते. घोडबंदर आणि चेन्याचा जरुर विचार व्हायला पाहिजे. दोन्ही ठिकाणी शौचालय नाममात्र नाही आहेत.

**नयना वसाणी :-**

आपल्या मा. पंतप्रधानानी सांगितले आहे महिलांसाठी स्पेशल शौचालय असायला पाहिजे. तर त्या गोष्टीचा त्याच्यामध्ये विचार करु शकतो.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब आपण ह्याबाबत जिल्हाधिकारी ह्यांच्याबरोबर चर्चा करावी. हा निधी त्या जागेकरिता जास्तच आहे. तर काही पर्सेन्टेज घोडबंदर, काशी, चेना ह्या गावात आरोग्य केंद्र, शौचालय बांधण्यासाठी वापरता येईल का?

**सुहास रकवी :-**

जिल्हाधिकाऱ्याची परवानगी देण्यापूर्वी आपला सुचनेसहित द्यावा. आपला ठराव पहिला मंजूर करुन घ्यायला लागेल.

**मा. सभापती :-**

शासनाचा जी.आर. असल्यामुळे त्याची पूर्तता आपल्याला करायला लागेल. ही माहिती घेतली तर करु. पुढची सभा आहेच.

**सुहास रकवी :-**

दलित वस्ती फंड दरवर्षी असतो. पण तुम्ही सुचनेसह ठराव पाठवला. आता वसाणी मॅडम म्हणाल्या शौचालय बांधा तर तिकडे जागा असेल तर दोन दिवसात मिटींग घेऊन ठराव करु.

**मा. सभापती :-**

दोन दिवसात पाहणी करुन घेऊ. तोपर्यंत तुम्ही जिल्हाधिकाऱ्याकडून माहिती घ्या.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

शासन निर्णयाच्या बाहेर जाण्याचे अधिकारी जिल्हाधिकाऱ्यांना नाहीत. आपल्याला काम सुचवण्याचा अधिकार आहे. त्याप्रमाणे आपण शौचालय सूचवू शकतो.

**मा. सभापती :-**

बाकी दलित वस्तीमध्ये आहे तो पर्सेन्टेज करता येईल का?

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

५० टक्के तो जो कॉन्टम आहे तो सर्टिफाय करणे मुश्कील आहे. त्याचा रेकॉर्ड उपलब्ध नाही. त्यामुळे ते जिल्हाधिकाऱ्याकडे मंजूर होणार नाही.

**नयना वसाणी :-**

आपण त्यांना रिक्वेस्ट टाकू शकतो ना.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

जागेची उपलब्धता नाही.

**सुहास रकवी :-**

ह्या एरियामध्ये आलेला फंड लॅप्स होऊ नये.

**नयना वसाणी :-**

तो विषय आपण पुढच्या सभेमध्ये घेणार आहोत. आपल्याकडे ५० टक्के आहे का माहित नाही पण त्यासाईडला दलित वस्ती आहे.

**मा. सभापती :-**

सुचना करुन घ्या तो विषय फेरसादर आहे.

**प्रकरण क्र. १४२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करावयाच्या कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. १३६ :-**

राज्य शासनाच्या नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रातील अनुसुचित जाती तसेच नवबौध्दांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसुचित जातीच्या राखीव प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीमधील अनुसुचित जाती व नवबौध्द विशेष घटक यांची लोकसंख्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक आहे. अशा वस्त्यांमध्ये शासन निर्णय क्र. विधायो/१०२०/१५९२/प्र.क्र.१८९/नवि-४, मंत्रालय मुंबई, दि. ०५/०३/२००२ च्या शासन निर्णयानुसार नागरी सुविधा विषयक कामे हाती घेता येतात. सदर योजनेच्या कामासाठी १०० टक्के अनुदान शासनाकडून प्राप्त होत असून मा. जिल्हाधिकारी यांचेमार्फत कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येते. मिरा भाईंदर महानगरपालिकामार्फत सदर योजनेअंतर्गत करावयाच्या नागरी सुविधा विषयक कामाची अनुसुचित जातीकरीता आरक्षित असलेल्या प्रभागातून खालीलप्रमाणे कामे प्रस्तावित करण्यात येत आहे. अ.क्र. १ ते १८ पर्यंत वरील कामांमध्ये नागरी सुविधा देण्याच्या दृष्टीने म्हणजे शौचालय, वाचनालय, आरोग्य केंद्र वगैरे बांधण्याचे प्रस्तावित केलेले नाहीत. तरी सदर बाबतची महत्वाची कामे घेतल्यानंतर हा विषय फेरसादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. नयना वसाणी                    अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४३, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागातील उद्याने, स्मशाने, मैदाने व रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करणेकरीता लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणेकामाच्या वार्षिक निविदेस मान्यता देणेबाबत.

**मोहन जाधव :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, स्मशाने, मैदाने व रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करणेकरीता **लालमाती, शेणखत पुरवठा करणे व खेळणी बसविण्यात आलेल्या ठिकाणी सफेदरेती पुरवठा** करणेकामी **मा. उप-आयुक्त (मु.) तथा निविदा समिती अध्यक्ष** यांच्या **दि. १२/११/२०१४ रोजीच्या मान्यंतेने** (फेरनिविदा प्रसिध्दीस) दि. १८/११/२०१४ रोजीच्या जाहीर निविदा सुचनेप्रमाणे **दै. प्रहार व दै. बहुजनरत्न लोकनायक** या वृत्तपत्रात तसेच **E-Tendering** प्रणालीद्वारे **जाहिर फेर निविदा** मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेची **मुदत दि. १९/११/२०१४ ते दि. २८/११/२०१४** या कालावधीत दुपारी ०१.०० वाजेपर्यंत होती. सदर कालावधीत **एकच निविदा प्राप्त** झाल्यामुळे जास्तीत जास्त निविदा प्राप्त होवून स्पर्धात्मक दर मिळण्याच्या दृष्टीकोणातुन सदर निविदेस **दि.०१/१२/२०१४ ते ०३/१२/२०१४ रोजी** दै. प्रहार व दै. बहुजनरत्न लोकनायक या वृत्तपत्रात व ई-टेंडरींग प्रणालीव्दारे **प्रथम मुदतवाढ** प्रसिध्दी करण्यात आली. सदर कालावधीत **दोन निविदा प्राप्त** झाल्याने जास्तीत जास्त निविदा प्राप्त होवून स्पर्धात्मक दर मिळण्याच्या दृष्टीकोणातुन सदर निविदेस पुनःश्च **दि.०४/१२/२०१४ ते ०६/१२/२०१४ रोजी** दै. प्रहार व दै. बहुजनरत्न लोकनायक या वृत्तपत्रात व ई-टेंडरींग प्रणाली व्दारे **व्दितीय मुदतवाढ** प्रसिध्दी करण्यात आली. सदर कालावधीतही **दोनच निविदा प्राप्त** झाल्याने जास्तीत जास्त निविदा प्राप्त होवून स्पर्धात्मक दर मिळण्याच्या दृष्टीकोणातुन सदर निविदेस पुनःश्च **दि.०८/१२/२०१४ ते १०/१२/२०१४ रोजी** दै. प्रहार व दै. बहुजनरत्न लोकनायक या वृत्तपत्रात व ई-टेंडरींग प्रणाली व्दारे **तृतीय मुदतवाढ** प्रसिध्दी करण्यात आली. सदर कालावधीतही **दोनच निविदा प्राप्त** झालेल्या असून सदर निविदेचे **Technical Bid** उघडयात यावे किंवा कसे याबाबत आदेशार्थ सादर केले असता सदर फेरनिविदेस **अल्प प्रतिसाधामुळे तीन वेळा** मुदतवाढ देण्यात आली होती**.** सदर निविदेस दोनपेक्षा जास्त मुदतवाढ दिल्याने **दोन निविदांचा तांत्रिक लिफाफा उघडण्यास मा. अध्यक्ष निविदा समिती व मुख्यलेखापरिक्षक** यांनी **दि. १५/१२/२०१४ रोजी मान्यता** दिली.

सदर मान्यतेनुसार निविदा धारकांची **Technical Bid दि. १७/१२/२०१४** रोजी **उघण्यात आले** असता खालीलप्रमाणे दोन निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत.

**१) मे. भुषण ट्रान्सपोर्ट**

**२) मे. आर. एस. कन्स्ट्रक्शन**

वरीलप्रमाणे प्राप्त एकुण दोन निविदा विहित मुदतीत व तांत्रीक दृष्टया प्राप्त झाल्या असुन सदर निविदांची Financial Bid उघडणेबाबत मा. अध्यक्ष, निविदा समिती यांनी दि.२०/१२/२०१४ रोजी मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार दि.२२/१२/२०१४ रोजी सदर निविदेचे Financial Bid उघडून तुलनात्मक तक्ता/ विवरणपत्र सोबत जोडले असुन त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशिल | मे. आर.एस. कन्स्ट्रक्शन | मे.भुषण ट्रान्सपोर्ट |
|---|---|---|---|
| १. | लालमाती | **रु.२२२३/- प्र.ब्रास** | रु.२७९०/- प्र.ब्रास |
| २. | शेणखत | रु.२२२३/-प्र.ब्रास | **रु.२०८०/- प्र.ब्रास** |
| ३. | सफेदरेती | **रु.४५००/-प्र.ब्रास** | रु.९८७५/- प्र.ब्रास |

उपरोक्त तक्त्यातील दोन्ही निविदाधारकांना वाटाघाटीकरता बोलिवले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर कमी केलेले आहेत. व तसे दि. ३०/१२/२०१४ रोजी लेखी पत्र दिले आहे.

| अ.क्र | तपशिल | मे. आर.एस. कन्स्ट्रक्शन | वाटाघाटीनंतरचे दर | मे.भुषण ट्रान्सपोर्ट | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | लालमाती | **रु.२२२३/- प्र.ब्रास** | **२१००/-प्र.ब्रास** | रु.२७९०/- प्र.ब्रास | -- |
| २ | शेणखत | रु.२२२३/-प्र.ब्रास | -- | **रु.२०८०/- प्र.ब्रास** | **१९००/- प्र.ब्रास** |
| ३ | सफेदरेती | **रु.४५००/-प्र.ब्रास** | **४२००/- प्र.ब्रास** | रु.९८७५/- प्र.ब्रास | -- |

**सन २०१४-१५** या आर्थिक वर्षात **"माती शेणखत खरेदी"** पुरवठा करणे या लेखाशिर्षाखाली **रु. ६०.००** (साठ लाख मात्र) लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.

या आर्थिक वर्षामध्ये ठेवण्यात आलेल्या तुदतुदीपैकी रू. २३ लाख लालमाती पुरवठा करणेकरीता व रू. २ लाख शेणखत पुरवठा करणेकरीता आलेल्या कमी दराच्या निविदा **मे. आर.एस. कंस्ट्रक्शन यांची लालमाती व सफेदरेती** पुरवठा करणे, **भुषण ट्रान्सपोर्ट यांची शेणखत** पुरवठा करणेकामी स्वीकारण्यात येत आहेत. प्राप्त झालेल्या निविदे प्रमाणे सदर खर्चाची तरतुद ३१ मार्च २०१५ पर्यंत ठेवण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त पुरवठा करणा-या ठेकेदारांच्या निविदेच्या येणा-या खर्चास मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**जयंतीलाल पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**सुहास रकवी :-**

एक सुचना आहे. निविदा मंजूर झाली एवढच कळले. आपल्या सुभाषचंद्र बोसच्या इथे दोन्ही ह्याच्यात डिव्हायडर लावले आहेत जे सगळे तुटलेले आहेत. खांबित साहेब ते आर.सी.सी. करुन घेतले ते पण चालेल. तिकडे झोपडपट्टीची मूल असतात तर कधी ॲक्सीडंट होईल. ते दलित वस्ती सुधारणामध्ये घेतले तरी चालेल.

**राजेंद्र जैन :-**

लाल मिट्टी है। उसका अपने अधिकारी से स्पष्टीकरण चाहिए की, कितनी कॉन्टेटी जाती है। मुरकुटे साहब आप कैसा व्हेरीफाय करते हो की, कितनी मिट्टी का बिल अपने पास आता है। उतनी मिट्टी ग्राऊंड पे गई इंजिनिअर का साईन होता है। मुझे यह जानकारी चाहिए की उसका व्हेरिफिकेशन कैसे होता है?

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो विविध ठिकाणी जेव्हा लाल मातीची आवश्यकता असते त्यानुसार आपण बांधकाम विभागाकडून इस्टीमेंट उपलब्ध करुन घेतो की त्याठिकाणी किती ब्रासची आवश्यकता आहे. त्याचे ते मोजमाप देतात इतक्या ब्रासची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने माती टाकली जाते आणि माती टाकल्यानंतर पुन्हा बांधकाम विभागाकडून माहिती घेतली जाते. किती ब्रास मातीचा तो भराव झालेला आहे. आणि त्यांनी सांगितल्यानंतर देयक देण्यात येतात त्यासाठी आपण रॉयल्टीच्या पावत्या उपलब्ध करतो.

**राजेंद्र जैन :-**

मुझे मालूम है संख्या होती है ६० की और ८० दिखाते है। ऐसा न हो इसके लिए क्या कर सकते है। उधर लेवल किया उन्होंने इस्टीमेंट दिया इस्टीमेंट का आयडीया आता है। कितना कम्पलशन करेंगे कितना लूज छोडेंगे। कैसा रेकॉर्ड मिलेगा जितना ट्रक आपने मांगा है। इस्टीमेंट पैसा गया है रिक्वायरमेंट हो गया साईन हो गया।

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

आपल्याकडे ट्रकचा नंबर असतो त्याच्यामध्ये तो किती ब्रासचा ट्रक आहे ते असते.

**राजेंद्र जैन :-**

उसकी पिक्चर फोटो नहीं होती।

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

उसकी फोटो नहीं निकालते रॉयल्टी असते. रॉयल्टीची पावती असते.

**सुहास रकवी :-**

रॉयल्टी बोला ना इट्स अ महसूल वो रॉयल्टी जहाँ से मिट्टी निकालते है। उतना उनको परमिशन दो ब्रास का है तो दो ब्रास का। तुम्हाला एवढच सांगायचे आहे झाड किती लावली माती किती गेली. गेल्या तीन वर्षांचे टेंडर काही ठेकेदाराना दिलेले. त्याचे म्हणणे आहे देयकच दिलेले नाही. मग ते पैसे गेले कुठे ज्या लोकांनी हे जे केल होत झाड लावा, जगवा त्याची तीन वर्षात मेन्टेन करा. त्याचे देयक दिले गेले का?

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याचे संपूर्ण देयक अदा करण्यात आलेले नाहीत. २००९ चा काळ असेल त्यावेळेस मी सुध्दा कार्यरत नव्हतो. जे ठेकेदार नेमण्यात आले त्याचे पूर्ण देयक अदा करण्यात आले नाही.

**सुहास रकवी :-**

त्यांनी लावलेल्या झाडाचे देयक कोणाला दिले ते सांगा.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

काही पेमेन्ट झालेले आहे मी बघितलेले आहे. परंतु पूर्ण पेमेन्ट झालेले नाही.

**सुहास रकवी :-**

का दिले गेले नाही. त्याचे जे लोखंडी पिंजरे असतात त्याची झाडे लावली ते पैसे कोणाला दिले. आणि नाही दिले तर का नाही दिले? ६ जून का वृक्षप्राधिकरण का दिन रहता है। त्या दिवसानिमित्त शहरामध्ये झाड लावा. आपण लोकांना एक मेसेज देतो तेही गेल्या वेळेला केलेले नाही. आपण वृक्षप्राधिकरणमध्ये असताना ह्या लोकांनी तो कार्यक्रम केला नव्हता. हे काय करतात दुस-याकडून लावलेल्या बिलाचे पैसे कोणाला देतात ते कळत नाही. कुरळेकर साहेबांना विनंती आहे की, त्यांनी देयक दिले नसेल तर त्यांना द्या आणि दिले गेले असेल तर कोणाला दिले त्याची माहिती घ्या.

**मा. सभापती :-**

सदर माहिती पुढील सभेत सादर करण्यात यावी.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय अभी जो रकवी साहबने जानकारी थी इन्होंने बताया की, बिल नहीं दिया गया। सबकी जानकारी में था ही नहीं। बेसिकली कोई भी काम करते है तो उसकी अंतिम परिनिती कहकर राईटली उन और रॉगली डन इसकी जबाबदारी किसकी है। ऑडिट की बराबर है। ऑडिट तीन तरह की होती है। शासन की ऑडिट, लोकल ऑडिट, और थर्ड पार्टी ऑडिट शासन के ऑडिट का रिपोर्ट स्टँडिंग में आया मुझे तो दो सालसे ध्यान में नही अपना एम.बी.एम.सी. का ऑडिट अभी तक आया ध्यान में नहीं है। और थर्ड पार्टी ऑडिट जो बडे-बडे प्रोजेक्ट चलते है उसका मैंने नेट पे निकाला उसपे कोकम डॉटकॉम पे क्लियर लिखा है। थर्ड पार्टी ऑडिट अन नेसेसरी टू टेल द लेजीस लेटीव्ह बॉडी बिकॉज दे वेयर रॅम्पन करन्शन इन ऑफिशियलस ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर यह कोकम डॉटकॉम पे लिखा गया है ॲन्ड टू चेक द प्रॅक्टीस वि अपॉइंट थर्ड पार्टी ऑडिट ॲन्ड थर्ड पार्टी ऑडिट कॉल स्टॅन्डिंग कमीटी ॲन्ड दे कॅन टेल अस की ॲक्चूली क्या हो रहा है। मैंने रिक्वेस्ट किया है की, स्टॅडिंग के अंदर जल्द से जल्द शासन की ऑडिट रिपोर्ट, एम.बी.एम.सी ऑडिट की रिपोर्ट और सब थर्ड पार्टी ऑडिट को अलग-अलग विषय के उपर उनको यहाँ पर हाजीर किया जाए।

**मा. सभापती :-**

आपण ह्या संदर्भात थर्ड पार्टी ऑडिट ठेवली आहे. वृक्ष प्राधिकरणला थर्ड पार्टी ऑडिट आहे का?

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

नाही.

**राजेंद्र जैन :-**

थर्ड पार्टी ऑडिट के बेसीक जनरेशन का मतलब है वो यह है हम लोगो को टेक्नीकल लोग नही है। हमे मालूम पडे की वो कैसे काम करे। तो वो हमे फिजिकली मिलती नही है। मा. सभापती महोदय आपसे रिक्वेस्ट है जिस पार्टी का थर्ड पार्टी ऑडिट है उन्हें यहाँ बूलाके उसे विनंती किया जाए की यह लोग कैसे काम करते है। हमे क्या चेक करना चाहिए। बिकॉज दॅट इत मेन्ट फॉर अस ओन्ली. और लोकल एम.बी.एम.सी. ऑडिट है जैसे बिल नहीं हुआ यह सारे पॉइंट साथ मिलेंगे तो हमें जानकारी रहेगी जो आदमी संबंधीत विषय का है उसको मालूम पडेगा बाकी किसको मालूम नहीं पडेगा।

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

डॉ. साहब बोल रहे है थोडा उसमें सुधार है। आपको जानकारी मिलना चाहिए उसमें कोई शक नहीं है। आपके सामने आना चाहिए आने में दिक्कत नही है। लेकिन थर्ड पार्टी ऑडिट यहाँ इसलिए नहीं है। थर्ड पार्टी ऑडिट इसलिए रहता है की मैं एम.व्ही बना रहा हूँ, मैं वर्क ऑर्डर दे रहा हूँ, मैं काम को सुपरव्हाइज कर रहा हूँ। तो किसी थर्ड पार्टी को उसको सर्टिफाय करना है देखता है। यह काम बराबर हो रहा है की नहीं। इस्टीमेंट क्या था इन्होंने क्या एक्झीक्यूट किया। इस टाईप में वो थर्ड पार्टी ऑडिट रहता है। बॉडी के सामने रखने में कोई दिक्कत नहीं है। इसलिए वो भी रखेंगे। और ऑडिट की जो बात है अपने पास जो ॲन्यूअल ऑडिट रिपोर्ट है वह जनरल बॉडी के सामने रखना ही रखना है ऑलरेडी हम रख चूके है।

**राजेंद्र जैन :-**

आप जो बोल रहे है समझने के लिए चेक करना थर्ड पार्टी का काम है। तो चेक कौन करेगा रिप्रेझेन्टीव्ह चेक करेंगे ना, थर्ड पार्टी ऑडिट आपके लिए नहीं है। इसलिए है की हम लोग समझे।

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर. थर्ड पार्टी ऑडिट जे आहे दी शुल्ड रिक्वायर्ड. ते करुन घ्या आणि सदस्यांच्या समोर आणा. अधिकारी, सदस्य आणि जनता ह्याच्यामध्ये समन्वय राहिला तर वाद निर्माण होणारच नाही. थर्ड पार्टी ऑडिट कधी लागू होणार म्हणजे कितीचे टेंडर किंवा कॉस्ट असेल त्याच्या ....................

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

५० लाखाच्या ..........................

**मा. सभापती :-**

तसे पूर्ण ब्रिफींग देऊन टाका. जिथे महत्वाचे आहे तिथे लाऊन मग द्या. ऑडिट रिपोर्ट द्यायला काय?

**प्रकरण क्र. १४३ :-**

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागातील उद्याने, स्मशाने, मैदाने व रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करणेकरीता लालमाती, शेणखत व सफेदरेती पुरवठा करणेकामाच्या वार्षिक निविदेस मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. १३७ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, स्मशाने, मैदाने व रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करणेकरीता **लालमाती, शेणखत पुरवठा करणे व खेळणी बसविण्यात आलेल्या ठिकाणी सफेदरेती पुरवठा** करणेकामी **मा. उप-आयुक्त (मु.) तथा निविदा समिती अध्यक्ष** यांच्या **दि. १२/११/२०१४ रोजीच्या मान्यंतेने** (फेरनिविदा प्रसिध्दीस) दि. १८/११/२०१४ रोजीच्या जाहीर निविदा सुचनेप्रमाणे **दै. प्रहार व दै. बहुजनरत्न लोकनायक** या

वृत्तपत्रात तसेच **E-Tendering** प्रणालीद्वारे **जाहिर फेर निविदा** मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेची **मुदत दि. १९/११/२०१४ ते दि. २८/११/२०१४** या कालावधीत दुपारी ०१.०० वाजेपर्यंत होती. सदर कालावधीत **एकच निविदा प्राप्त** झाल्यामुळे जास्तीत जास्त निविदा प्राप्त होवून स्पर्धात्मक दर मिळण्याच्या दृष्टीकोणातुन सदर निविदेस **दि.०१/१२/२०१४ ते ०३/१२/२०१४ रोजी** दै. प्रहार व दै. बहुजनरत्न लोकनायक या वृत्तपत्रात व ई-टेंडरींग प्रणालीव्दारे **प्रथम मुदतवाढ** प्रसिध्दी करण्यात आली. सदर कालावधीत **दोन निविदा प्राप्त** झाल्याने जास्तीत जास्त निविदा प्राप्त होवून स्पर्धात्मक दर मिळण्याच्या दृष्टीकोणातुन सदर निविदेस पुनःश्च **दि.०४/१२/२०१४ ते ०६/१२/२०१४ रोजी** दै. प्रहार व दै. बहुजनरत्न लोकनायक या वृत्तपत्रात व ई-टेंडरींग प्रणाली व्दारे **व्दितीय मुदतवाढ** प्रसिध्दी करण्यात आली. सदर कालावधीतही **दोनच निविदा प्राप्त** झाल्याने जास्तीत जास्त निविदा प्राप्त होवून स्पर्धात्मक दर मिळण्याच्या दृष्टीकोणातुन सदर निविदेस पुनःश्च **दि.०८/१२/२०१४ ते १०/१२/२०१४ रोजी** दै. प्रहार व दै. बहुजनरत्न लोकनायक या वृत्तपत्रात व ई-टेंडरींग प्रणाली व्दारे **तृतीय मुदतवाढ** प्रसिध्दी करण्यात आली. सदर कालावधीतही **दोनच निविदा प्राप्त** झालेल्या असून सदर निविदेचे **Technical Bid** उघडयात यावे किंवा कसे याबाबत आदेशार्थ सादर केले असता सदर फेरनिविदेस **अल्प प्रतिसाधामुळे तीन वेळा** मुदतवाढ देण्यात आली होती. सदर निविदेस दोनपेक्षा जास्त मुदतवाढ दिल्याने **दोन निविदांचा तांत्रिक लिफाफा उघडण्यास मा. अध्यक्ष निविदा समिती व मुख्यलेखापरिक्षक** यांनी **दि. १५/१२/२०१४ रोजी मान्यता** दिली.

सदर मान्यतेनुसार निविदा धारकांची **Technical Bid दि. १७/१२/२०१४** रोजी **उघण्यात आले** असता खालीलप्रमाणे दोन निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत.

**१) मे. भुषण ट्रान्सपोर्ट**

**२) मे. आर. एस. कन्स्ट्रक्शन**

वरीलप्रमाणे प्राप्त एकुण दोन निविदा विहित मुदतीत व तांत्रीक दृष्टया प्राप्त झाल्या असुन सदर निविदांची Financial Bid उघडणेबाबत मा. अध्यक्ष, निविदा समिती यांनी दि.२०/१२/२०१४ रोजी मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार दि.२२/१२/२०१४ रोजी सदर निविदेचे Financial Bid उघडून तुलनात्मक तक्ता/ विवरणपत्र सोबत जोडले असुन त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र** | **तपशिल** | **मे. आर.एस. कन्स्ट्रक्शन** | **मे.भुषण ट्रान्सपोर्ट** |
|---|---|---|---|
| **१.** | **लालमाती** | **रु.२२२३/- प्र.ब्रास** | रु.२७९०/- प्र.ब्रास |
| **२.** | **शेणखत** | रु.२२२३/-प्र.ब्रास | **रु.२०८०/- प्र.ब्रास** |
| **३.** | **सफेदरेती** | **रु.४५००/-प्र.ब्रास** | रु.९८७५/- प्र.ब्रास |

उपरोक्त तक्त्यातील दोन्ही निविदाधारकांना वाटाघाटीकरता बोलिवले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर कमी केलेले आहेत. व तसे दि. ३०/१२/२०१४ रोजी लेखी पत्र दिले आहे.

| **अ.क्र** | **तपशिल** | **मे. आर.एस. कन्स्ट्रक्शन** | **वाटाघाटीनंतरचे दर** | **मे.भुषण ट्रान्सपोर्ट** | **वाटाघाटीनंतरचे दर** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **लालमाती** | **रु.२२२३/- प्र.ब्रास** | **२१००/-प्र.ब्रास** | रु.२७९०/- प्र.ब्रास | -- |
| **२** | **शेणखत** | रु.२२२३/-प्र.ब्रास | -- | **रु.२०८०/- प्र.ब्रास** | **१९००/- प्र.ब्रास** |
| **३** | **सफेदरेती** | **रु.४५००/-प्र.ब्रास** | **४२००/- प्र.ब्रास** | रु.९८७५/- प्र.ब्रास | -- |

**सन २०१४-१५** या आर्थिक वर्षात **"माती शेणखत खरेदी"** पुरवठा करणे या लेखाशिर्षाखाली **रू. ६०.००** (साठ लाख मात्र) लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.

या आर्थिक वर्षामध्ये ठेवण्यात आलेल्या तुदतुदीपैकी रू. २३ लाख लालमाती पुरवठा करणेकरीता व रू. २ लाख शेणखत पुरवठा करणेकरीता आलेल्या कमी दराच्या निविदा **मे. आर.एस. कंस्ट्रक्शन यांची लालमाती व सफेदरेती** पुरवठा करणे, **भुषण ट्रान्सपोर्ट यांची शेणखत** पुरवठा करणेकामी स्वीकारण्यात येत आहेत. प्राप्त झालेल्या निविदे प्रमाणे सदर खर्चाची तरतुद ३१ मार्च २०१५ पर्यंत ठेवण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त पुरवठा करणा-या ठेकेदारांच्या निविदेच्या येणा-या खर्चास मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. मोहन जाधव** **अनुमोदक :- श्री. जयंतीलाल पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४४ के प्रस्ताव मा. वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य व अधिकारी, कर्मचारी यांचा अभ्यास दौरा आयोजित करण्याबाबत.

**नयना वसाणी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये मा. वृक्ष प्राधिकरण समितीची स्थापना दि. १९/०६/२००३ मध्ये झाली आहे. सध्या या समितीमध्ये एकूण १५ सदस्य आहेत. सदर समितीचे अध्यक्ष मा. आयुक्त साो. असून सदस्य सचिव म्हणून मा. उप-आयुक्त आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र मुंबई महानगरालगत असून शहराची लोकसंख्या वेगाने वाढत असून विकास झपाटयाने होत आहे. शहरामध्ये मुलभुत नागरी सोयी-सुविधा पुरवणे, शहराचा सर्वांगीण विकास करणे, शहराच्या हिताच्या दृष्टीने शहरात वेगवेगळया ठिकाणी आधुनिक पध्दतीने उद्याने / थीम पार्क विकसित करण्याकामी भारतातील इतर ठिकाणी जावुन पाहणी व अभ्यास करणे आवश्यक आहे. या करीता मा. वृक्षप्राधिकरण समिती सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांचा अभ्यास दौरा ईशान्येकडील राज्य **आसाम, मेघालय, अरूणाचल प्रदेश इ. ठिकाणी** आयोजित करण्याबाबत सुचित केलेले आहे. यापुर्वी मा. वृक्षप्राधिकरण समिती सदस्यांचा अभ्यास दौरा वेळोवेळी खालील ठिकाणी आयोजित करण्यात आलेला होता.

| अ.क्र. | सन | ठिकाण |
|---|---|---|
| १. | २००९-१० | १. उत्तरांचल राज्यामध्ये दिल्ली, डेहरादून, उत्तरांचल इ. ठिकाणी.<br>२. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.<br>३. कर्नाटक, तामीळनाडू, केरळ राज्यांमध्ये<br>४. कोकाण कृषी विदयापीठ, दापोली, जि.रत्नागिरी |
| २. | २०१०-११ | पश्चिम बंगाल व सिक्कीम राज्यामध्ये |
| ३. | २०११-१२ | हिमाचल प्रदेश राज्यामध्ये |
| ४. | २०१३-१४ | पश्चिम बंगाल व सिक्कीम राज्यामध्ये |

सन २०१२-१३ मध्ये अभ्यास दौरा आयोजित करण्यात आलेला नव्हता. सन २०१४-१५ मध्ये मा. वृक्षप्राधिकरण समिती सदस्यांचा अभ्यास दौरा आयोजित केल्यास सदर ठिकाणच्या उदयानांच्या रचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उदयाने विकसित करण्यास मदत होईल.

**सन २०१४-१५** अंदाजपत्रकामध्ये **"अभ्यास दौरा"** या लेखाशिर्षकाखाली **रू. १५.००** लाखाची **तरतुद** केलेली आहे. त्यानुसार आसाम, अरूणाचल प्रदेश इ. ठिकाणी अभ्यास दौरा आयोजित करणेकामी **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये ५ (२) (२) अन्वये** Pyaramind Travels Mumbai -2 या एजन्सीकडून अभ्यासदौरा आयोजित करण्यास **मा. आयुक्त साो., यांना प्राधिकृत करीत असून** सदर दैऱ्याकरीता आवश्यक ती रक्कम अग्रीम स्वरूपात देण्यात यावी तसेच सदर दैऱ्यास येणाऱ्या खर्चास **मा. स्थायी समिती सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.**

**अश्विन कासोदरिया :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**सुहास रकवी :-**

ती एक एजन्सी ऑर्गनाइज करते. गेल्या वेळेला आम्ही वृक्षप्राधिकरण समितीत होते. आम्ही आमचा अभ्यास दौऱ्याचा निधी काही साहित्य खरेदीसाठी दिला होता. १५ लाखाचा निधी होता. आता आपण १५ लाख बोलता पण आसाम वैगेरे असेल तर हा निधी कमी पडेल. काही स्टँन्डिंगची लोक असतील ज्यांना जायची इच्छा असेल तर ते सुध्दा त्याच्यामध्ये जाऊ शकतात की नाही ते बघा त्याप्रमाणे पाठवा कारण अभ्यास दौऱ्यांसाठी दापोलीला जे कृषीसंशोधन केंद्र आहे ते खूप चांगले आहे. आपण दौरे करतो त्याचा आऊटपूट आताच कुरळेकर साहेबांनी सांगितले दोन आर्किटेक्ट म्हणजे जे लॅन्डस्केपींग करतात ते अपॉइंट केलेले आहेत. तो अभ्यास दौरा सक्सेसफूल झाला पाहिजे. त्याचप्रमाणे तरतूद जी आहे ती कमी पडत असेल तर ती वाढवून द्यायला हरकत नाही अशी माझी सूचना आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, अभ्यास दौरा हर साल होता है। अभ्यास दौरा शहर के लिए होता है। मेरे पास ऐसी एक भी रिपोर्ट नहीं जो अभ्यास दौरे से आने के बाद रिपोर्ट सबमीट की गई हो। की इस अभ्यास दौरे से मिरा भाईंदर में हम यह करेंगे। मिरा भाईंदर वृक्ष प्राधिकरण का दौरा यह दौरा यह वन विभाग के लिए है। आसाम और चेरापूंजी का वातावरण है, जो क्लायमेट है वह यहाँ से मेल खाती है क्या यहाँ के कौनसे क्लायमेंट में कौनसे पौदे लगेंगे कैसा प्लानिंग है। कमसे कम रिपोर्ट सादर किजीए की, हमने यह सिखा। आज के जमाने मे जहाँ नेट है कितनी जानकारी आप नेट पे ले सकते है। इसमें अभ्यास दौरे की आवश्यकता है क्या? मैं क्षमा चाहूँगा की मॅडम का प्रस्ताव है फिर भी मेरा व्यक्तिगत विचार है। मैं ऐसे दौरे जहाँ खाना पिना मजा करना उसको मैं विरोध करता हूँ।

**सुहास रकवी :-**

त्याचे म्हणणे आहे रद्द करा पण माझे म्हणणे आहे की, दौरे करायलाच हवे. कारण काही लोक नविन असतात.

**मा. सभापती :-**

ठराव सुचनेसह मंजूर.

**प्रकरण क्र. १४४ के प्रस्ताव :-**

मा. वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य व अधिकारी, कर्मचारी यांचा अभ्यास दौरा आयोजित करण्याबाबत.

**ठराव क्र. १३८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये मा. वृक्ष प्राधिकरण समितीची स्थापना दि. १९/०६/२००३ मध्ये झाली आहे. सध्या या समितीमध्ये एकूण १५ सदस्य आहेत. सदर समितीचे अध्यक्ष मा. आयुक्त साो. असून सदस्य सचिव म्हणून मा. उप-आयुक्त आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र मुंबई महानगरालगत असून शहराची लोकसंख्या वेगाने वाढत असून विकास झपाटयाने होत आहे. शहरामध्ये मुलभुत नागरी सोयी-सुविधा पुरवणे, शहराचा सर्वांगीण विकास करणे, शहराच्या हिताच्या दृष्टीने शहरात वेगवेगळया ठिकाणी आधुनिक पध्दतीने उद्याने / थीम पार्क विकसित करण्याकामी भारतातील इतर ठिकाणी जावुन पाहणी व अभ्यास करणे आवश्यक आहे. या करीता मा. वृक्षप्राधिकरण समिती सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांचा अभ्यास दौरा ईशान्येकडील राज्य **आसाम, मेघालय, अरूणाचल प्रदेश इ. ठिकाणी** आयोजित करण्याबाबत सुचित केलेले आहे. यापुर्वी मा. वृक्षप्राधिकरण समिती सदस्यांचा अभ्यास दौरा वेळोवेळी खालील ठिकाणी आयोजित करण्यात आलेला होता.

| अ.क्र. | सन | ठिकाण |
|---|---|---|
| १. | २००९-१० | ५. उत्तरांचल राज्यामध्ये दिल्ली, डेहरादून, उत्तरांचल इ. ठिकाणी.<br>६. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.<br>७. कर्नाटक, तामीळनाडू, केरळ राज्यांमध्ये<br>८. कोकाण कृषी विदयापीठ, दापोली, जि.रत्नागिरी |
| २. | २०१०-११ | पश्चिम बंगाल व सिक्कीम राज्यामध्ये |
| ३. | २०११-१२ | हिमाचल प्रदेश राज्यामध्ये |
| ४. | २०१३-१४ | पश्चिम बंगाल व सिक्कीम राज्यामध्ये |

सन २०१२-१३ मध्ये अभ्यास दौरा आयोजित करण्यात आलेला नव्हता. सन २०१४-१५ मध्ये मा. वृक्षप्राधिकरण समिती सदस्यांचा अभ्यास दौरा आयोजित केल्यास सदर ठिकाणच्या उदयानांच्या रचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उदयाने विकसित करण्यास मदत होईल.

**सन २०१४-१५** अंदाजपत्रकामध्ये **"अभ्यास दौरा"** या लेखाशिर्षकाखाली **रू. १५.००** लाखाची **तरतुद** केलेली आहे. त्यानुसार आसाम, अरूणाचल प्रदेश इ. ठिकाणी अभ्यास दौरा आयोजित करणेकामी **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये ५ (२) (२) अन्वये** Pyaramind Travels Mumbai -2 या एजन्सीकडून अभ्यासदौरा आयोजित करण्यास **मा. आयुक्त साो., यांना प्राधिकृत करीत असून** सदर दै-याकरीता आवश्यक ती रक्कम अग्रीम स्वरूपात देण्यात यावी तसेच सदर दै-यास येणा-या खर्चास **मा. स्थायी समिती सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.**

**सुचक :- डॉ. नयना वसाणी** **अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सुहास रकवी :-**

मा. सभापती महोदय, स्टॅन्डीगचे सदस्य ह्याच्यात जाणार का? तरतूद वाढवायची असेल तर लाख दोन लाख वाढवून घ्या. त्यामध्ये आरोग्य विभागाचे श्री. पानपट्टे साहेबांना पण न्या, म्हणजे सेंद्रीय खत कसे होते? कच-याची विल्हेवाट कशी होते. त्यांना घेऊन जा.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, कुरळेकर साहब को मैने पुछा की मिट्टी का डालने का तो अपना यह सात लाख का बजेट है जिसमे पानी का जी.पी.आर.एस. सिस्टम बोलते हो वह सिस्टम लगाने को कितना खर्चा आयेगा?

**मा. सभापती :-**

रॉयल्टी इज द गव्हरमेंट। उसको अपना बजेट है। एकही गाडी को एक रॉयल्टी चलती है दूसरे गाडी को नही चलती।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

रॉयल्टी आपने गव्हरमेंटसे लिया। एक कंपनी सफाई करते है वो गव्हरमेंटको दे सकती है।

**मा. सभापती :-**

रॉयल्टी जहॉ पर आप गाडी खाली करोगे वहॉ आपके साथ रॉयल्टी माँगते है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मैने ऑडीट का बोला था। शासन और मिरा भाईंदर महनगरपालिका का ऑडीट कबतक खाली हो जाएगा।

**मा. सभापती :-**

मगाशी प्रभाग अध्यक्षांचा विषय निघाला. माझ्या निदर्शनास आले की खेत्रेसाहेब आता आले. त्यांना विचारुन घेऊ. खेत्रे साहेब आपल्याला सभा होती हे माहित होते का?

**दादासाहेब खेत्रे :-**

हो.

**मा. सभापती :-**

आपण उशिरा का आलात?

**दादासाहेब खेत्रे :-**

मालजी पाड्याला टाटाचे सबस्टेशन झाले आहे ते तोडायला गेलो होतो.

**मा. सभापती :-**

आपल्याला ह्याबाबत माहिती होती.

**गणेश देशमुख (उपायुक्त (मु.)) :-**

तोडायला मीच सांगितले होते. स्टॅन्डीग सोडून तोडा असे नव्हते सांगितले.

**मा. सभापती :-**

मागच्या वेळेस सभेत आपला विषय झालेला होता. सदस्यांना प्रभाग अध्यक्ष स्टॅन्डींगमध्ये उपस्थित हवे होते. त्यामुळे तो विषय स्पेसिफिक सांगितलेला की, प्रभाग अध्यक्षांनी ह्या सभेत उपस्थित रहावे. आपल्याकडे असे होते त्यांनी तसे इन्टीमेशन द्यायला हवे होते. आपण ह्या गोष्टीची गय करु नये.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

प्रभाग समिती ३ आणि ४ चा मी वर्षभर पत्रव्यवहार करतो. गोल्डन नेस्टपासून इंद्रलोक नाका आणि आझाद नगरच्या परिसरामध्ये माझा जो पत्रव्यवहार झालेला आहे. तिथे वॉर्ड ऑफीसर जाणूनबुजून कोणतीही कारवाई करत नाही. त्या संदर्भात मला बोलायचे आहे. त्यांनी त्याचे उत्तर द्यावे.

**वासुदेव शिरवळकर (प्रभाग अध्यक्ष ३ व ४) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो. आमगावकर साहेबांनी गोल्डन नेस्ट परिसरामधील जी तक्रार केलेली होती. गोल्डन नेस्ट पोलीस चौकी ते इंद्रलोक नाका ह्यावरील फेरीवाले हटवण्यासंदर्भात, तसेच स्पोर्टस कॉम्प्लेक्स जवळ जे फेरीवाले बसलेले आहेत. कायमस्वरुपी त्यांना काढण्याविषयी तक्रार होती आणि मी मागच्या २५ दिवसामध्ये कमीतकमी ९ वेळा मी काढलेली आहे आणि आता स्पोर्टस कॉम्प्लेक्सच्या तिथे एकही फेरीवाला बसत नाही. त्यांच्या हातगाड्या जप्त करुन तोडून टाकलेल्या आहेत. तसेच इंद्रलोकचा जो रस्ता आहे तिकडे कन्टीन्यु ९ दिवस कारवाई करुन फेरीवाले हटवले आहेत.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

आता मी तुम्हाला घेऊन जातो. तुम्ही काय सांगता स्पोर्टस क्लबच्या बाजूचे फेरीवाले उठवले. आता पण तिथे आहेत.

**वासुदेव शिरवळकर (प्रभाग अध्यक्ष ३ व ४) :-**

गाड्या उचलून तोडून टाकलेल्या आहेत.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

गोल्डन नेस्टच्या इकडे सर्व गाड्या आहेत.

**वासुदेव शिरवळकर (प्रभाग अध्यक्ष ३ व ४) :-**

स्पोर्टस कॉम्प्लेक्सच्या इकडच्या सर्व गाड्या तोडून टाकलेल्या आहेत.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

खोटं बोलायचा प्रयत्न करु नका. जे काही असेल ते सरळ सांगा.

**वासुदेव शिरवळकर (प्रभाग अध्यक्ष ३ व ४) :-**

मी खोटं बोलत नाही.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

तुम्ही कारवाई केलेली नाही. तुम्ही आता माझ्या बरोबर चला. मला त्याच्यावर पूर्ण कारवाई पाहिजे.

**मा. सभापती :-**

तुम्ही केलेल्या कारवाईचे फोटो, लागल्यास सन्मा. सदस्यांना तिथे बोलवून घ्या.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

ह्यांच्याकडे बंदोबस्त नसतो. मी स्वतः उभा राहून माझी माणस उभी करायची. त्यांच्याकडे बंदोबस्त नसतो. मग ह्यांनी करायचे काय? ह्यांच्याकडे बंदोबस्त नसल्यामुळे ह्यांनी गाड्या उचलायच्या नाहीत का? प्रत्येक रोडवर सॅन्डविचच्या गाड्या आहेत.

**सुहास रकवी :-**

आमगावकर साहेबांनी म्हटल्याप्रमाणे सदस्यांनी जायची गरज नाही. सदस्यांनी सुचना द्यायच्या आहेत. त्यांनी कारवाई करायची. सदस्य तिथे ऑब्जेक्शन घेतो हे लोकांच्या समोर विरोध करतात. स्टील इंडस्ट्रीजचे पत्र दिले होते. सगळे वरचे गाळे तोडले. खालचे फक्त दोन ठेवले. त्याच्या पत्राचे उत्तर खांबित साहेबांकडून आलेले होते. अजूनही ते गाळे ते इंडस्ट्रीयल पूर्ण तोडलेले नाही. किती दिवसात तोडतील ते सांगाव.

**मा. सभापती :-**

ह्या संदर्भात मी माझा अनुभव सांगतो. असे पण प्रभाग अधिकारी आहेत. जे सकाळी कन्टीन्यु फोनवर असतात आणि सांगतात आता कारवाई करतो, पाच मिनिटांनी कारवाई करतो. मी जागेवर पोहोचलो आहे, पोलीस घेतो आहे. त्याच्यानंतर ४.३० पर्यंत माणूस थांबून राहतो. समोरची व्यक्ती कोर्टातून स्टे घेवून येतो. नंतर फोन बंद. त्यानंतर उत्तर येते की साहेब त्यांनी स्टे आणला. असेपण इथे प्रकार घडतात. ह्या गोष्टीवर दुर्लक्ष होता कामा नये. ही सर्वांची समस्या आहे.

**सुहास रकवी :-**

कारवाई कधी करणार ते आता सांगावे.

**नयना वसाणी :-**

मा. सभापती महोदय, मला ह्याच्यावर बोलायचे आहे की, आपण महापालिकेच्या प्रशासनाचे एवढे पैसे खर्च करतो, इमारती बांधतो, रस्ते बांधतो. सुशोभिकरणावर एवढे पैसे खर्च करतो. मग हे फेरीवाले बसेपर्यंत ह्यांची वाट का बघतात. ते २-३ महिने बसल्यानंतर कोणाची तक्रार आली की, मग तुम्ही जाता. तिकडे घाण करता. मग तिकडे सुशोभिकरण करु नका. मग त्यांनाच बसू द्या त्याच्यासाठीच ते बांधा. ९-९ दिवस तुम्हांला कारवाई करायला लागते. तुम्ही त्यांना बसूनच कशाला देता?

**अश्विन कासोदरीया :-**

एशियन मोटरचे मी एक ते दिड वर्ष झाले लेटर दिले आहे. तिकडे बीम काढून बाहेर गॅलरी काढलेली आहे. त्याच्यावर कारवाई करायला सांगितली. आजपर्यंत त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. त्याच्यावर डबल काम झाले. अजूनपर्यंत कोणतीही कारवाई केली नाही.

**नयना वसाणी :-**

स्पोर्टस क्लबजवळ पहिलेच फेरीवाले बसले असतील तर त्यांना उठवायला पाहिजे. १०-१५ बसेपर्यंत वाट बघता आणि मग कारवाई करता.

**गणेश देशमुख (उपायुक्त (मु.)) :-**

चर्चा झाली. त्याचा ड्राईव्ह घ्या आणि त्याचे फोटोग्राफ वगैरे ठेवा.

**सुहास रकवी :-**

साहेब चर्चा नाही त्याच्यावर कारवाई कधी करणार ते सांगा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती :-**

सर्व प्रभाग अधिका-यांना इन्स्ट्रक्शन द्यावे म्हणजे अतिक्रमण विभागाचे प्रमुख आहेत त्यांना बोलवा. सर्व प्रभाग अधिका-यांना सुचना द्या. पोलीस प्रोटेक्शनसाठी जे महत्वाचे आपल्याला लागणार आहेत त्यांना योग्य ते सहकार्य आपल्यामार्फत करण्यात यावे. सर्व सदस्य जागेवर जाऊ शकत नाही. त्यांच्या तक्रारी असतात. लोक त्याचा दुसरा विषय घेतात की ह्या माणसानेच आमचे काम काढले.

**प्रभात पाटील :-**

आपलेच अधिकारी सांगतात की, त्यांची तक्रार आहे.

**मा. सभापती :-**

सदस्यांनी नावे न घेण्याची कृपा करावी. तसे होता कामा नये.

**नयना वसाणी :-**

तुम्ही बसण्याच्या आधी कारवाई करा.

**नरेश पाटील :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो. गोल्डन नेस्टच्या सिग्नलवर फर्निचरवाले रोडवर फर्निचर लावतात. त्यामुळे शाळेतल्या येणा-या-जाणा-या मुलांना किती प्रॉब्लम होतो. मी अनेकवेळा कम्प्लेंट केली. परंतु, एकही अधिका-याने माझे आजपर्यंत ऐकले नाही. याचा अर्थ काय?

**मा. सभापती :-**

त्या रोडला गॅरेजवाले आहेत त्यांच्या गाड्या बाहेर लागलेल्या असतात त्यावर कारवाई व्हावी. खांबित साहेब त्या रोडवर २-३ शाळा आहेत. तिकडे आपल्यामार्फत काहीतरी प्रोव्हिजन करा. गोल्डन नेस्टच्या समोर

पोलीसांना स्पीडब्रेकरसाठी पत्रव्यवहार करा. कारण तिकडे दर दिवस एक ॲक्सीडंट होत असतो. तिकडे सुविधा करुन घ्या. गाड्या खुप फास्ट जातात आणि लहान मुल रस्ता क्रॉस करत असतात. त्याच्याबरोबर त्यांचे पालक असतात, आजीआजोबा असतात. आपला पादचारी पुल होणार ही भविष्यातली योजना आहे.

(सभागृहात गोंधळ)

**नयना वसाणी :-**

मा. सभापती महोदय, आपण पुर्नःपृष्ठीकरण करतो तेव्हा तिकडे स्पीडब्रेकर असला तरी परत त्याच्यावर करत नाही आणि तसाच रस्ता करुन जातात. असे सृष्टी सेक्टर-२ च्या तिकडे झाले आहे. लोकांच्या गाड्या तिकडे येतात. त्यांनी स्पीडब्रेकर रोड पृष्ठीकरणमध्ये घालवले आहेत.

**मा. सभापती :-**

असलेले स्पीडब्रेकर काढून टाका. त्या जागेवर पुन्हा करुन घ्या.

**दिपक खांबित :-**

इनलिगल स्पीडब्रेकर जेवढे परमिशन नाही ते काढून टाका म्हणून पोलीस अधिक्षक आणि हायकोर्टाचे आदेश आहेत. शहरातले जेवढे स्पीडब्रेकर आहेत त्याची यादी करुन पोलीसांकडे दिले आहेत. ज्यांच्यावर सर्वेक्षण वगैरे होण्यासारखे असेल ते आम्ही आयआरसी प्रमाणे करु आणि बाकीचे काढून टाकू.

**प्रभात पाटील :-**

मा. सभापती महोदय, महासभेला एक लक्षवेधी आणली होती. शहरामध्ये एवढे गॅरेज आहेत की, मुंबई शहरामध्ये नसतील. गोल्डन नेस्ट ते इंद्रलोक नाका इकडे तर कचऱ्यासारखे गॅरेजेस आहेत. रिलायन्सचे मोठे मोठे पोल तिकडूनच गेले आहेत. त्यामुळे तो मोठा रोड झाला एक दीडशे फुटाचा रोड त्या दोन्ही पोलच्या बाजूला त्यांना मस्त जागा मिळते. तिकडे प्रत्येक वाहनावर धुळीचा ३-४ इंचाचा थर बसलेला असतो. तरीसुध्दा त्या गाड्या तिकडेच उभ्या आहेत. आपण काहीच करत नाही. एक रुम घ्यायला आणि नावाला बोर्ड लावायचा आणि सगळी कामं रस्त्यात करायची. लोकांनी कसे पण जायचे?

**मा. सभापती :-**

अतिक्रमण विभागाचे बोरसे साहेब तुम्ही गॅरेजवाल्यांवर योग्य ती कारवाई करा. जोपर्यंत त्यांच्यावर आळा बसणार नाही तोपर्यंत वाहतुकीचा आपल्याला त्रास होईल.

**सुहास रकवी :-**

मा. सभापती साहेब, ते मी विषय सांगितले. एक सर्व्हीस रोडचा विषय घेऊन पूर्ण करा. दुसरे प्रभाग अधिकाऱ्यांनी सांगितले फुल मार्केटमध्ये डेंजर कन्स्ट्रक्शन नोटीस देऊन पूर्ण तोडलेली नाही आणि आमच्या विभागामध्ये एस.पी.एम.एल. वाल्यांनी सगळे रस्ते जाम केले आहेत. एस.पी.एम.एल. वाल्यांनी डांबरीकरण लवकर करावे. त्या रस्त्याचे निर्देश द्यावे.

**मा. सभापती :-**

साहेब ही तक्रार बऱ्याच ठिकाणची आहे. ज्या ठिकाणी काम चालू असेल त्याठिकाणी दुसरा रस्ता मोकळा ठेवावा. त्या रस्त्यावर खड्डे असतील रस्त्यावरुन वाहतुक होण्यासारखी नसेल तर ती वाहतुक होण्यासारखी योग्य करावी मॅक्सस मॉलचा रस्ता बंद झालेला आहे. बेकरी गल्लीच्या इकडून जाणारा रस्ता बंद आहे. जिथे काम झालेली आहेत तिथे पॅचवर्क पुर्ण करा. तसेच गाड्यांचे नुकसान होते ते आहेच. माणूस त्या रस्त्यावरुन चालताना पडला तर त्याला खर्च हा आलाच. नगरपालिका काय भरुन देणार नाही. सदर बाबत मी सर्व इन्स्ट्रक्शन दिलेले आहेत.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

कन्स्ट्रक्शन साईडमे डेब्रीज होती है। उसमेसे बिमारी फैलने की चान्स रहता है। उसको रोकने के लिए कुछ कायदे कानुन है की नही।

**संभाती पानपट्टे (उपायुक्त) :-**

आपण बॉयलॉज तयार केलेले आहेत. शासनाच्या अंतिम मंजूरीसाठी प्रलंबित आहेत. मंजूरी मिळाल्यानंतर कारवाई करतील.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

नवघर प्रभाग मे हॉटेल के पास तोडक कारवाई हुई थी। उधर जो कचरा पडा है वह उठाते क्यु नही।

**मा. सभापती :-**

रेती, ईट और सिमेंट इसका भुगा हुआ तो उसके उपर कचरा नही होता.

**नयना वसाणी :-**

मा. सभापती महोदय, रेती, ईट सब पडा रहता है। पब्लिक आकर उसके उपर कचरा डालती है।

**मा. सभापती :-**

जी कारवाई झालेली आहे आपण ती कारवाई करतो. आपल्या मार्फत अनधिकृत बांधकाम किंवा वाढीव बांधकाम असेल तर ते तोडतो. त्यानंतर जे रॅबीट पडते ते उचलायची जबाबदारी कोणाची?

**सुहास रकवी :-**

संबंधित सोसायटीवाल्यांची असते किंवा संबंधित व्यक्ती त्यांची असते.

**मा. सभापती :-**

महापालिकेने केलेल्या कारवाईनंतर जबाबदारी सोसायटीची आहे तर आपल्यामार्फत नोटीस जाते का? नोटीस गेल्यानंतरही जर त्यांनी उचलले नाही तर आपली काय प्रक्रिया असते. ह्या गोष्टीला प्राधान्य द्या.

**सुहास रकवी :-**

मेहता साहेबांच्या वॉर्डमध्ये भरपुर कचरा साचलेला असतो. तिकडच्या शिंदे साहेबांना विचारले तर त्यांना वाहन कमी पडतात कचरा उचलायला............

**डॉ. राजेंद्र जैन :-**

जो बिमारी फैलती है उसमे कई बार बात हुई यह जो आरोग्य विभाग है वो इसका जिम्मेदार रहेगा। इसमे आप धोरण निश्चित करो की यह काम ऐसे होनेवाला है।

**अश्विन कासोदरीया :-**

सेक्टर ५ में दो महिना हो गया, अभितक उठाया नही।

**सुहास रकवी :-**

पानपट्टे साहेब, तुम्हाला हेच सांगायचे आहे की, तुम्हाला आरोग्याविषयी थोडी काळजी थोडी चिंता असलीच पाहिजे. तुम्हाला तरतुद कमी पडत असेल, तुम्हाला काय सुविधा पाहिजे असेल तर ह्या बजेटमध्ये करुन घ्या. जसे-जसे शहर वाढणार तसा कचरा वाढणार. मी ह्याच्यात सुचना करतो की, त्याच्यामध्ये काय करता येईल. समजा त्यांनी सांगितले की, रॅबीट उचलायचे असेल तर त्याच्यासाठी डम्पर वगैरे लागणार असेल तर त्याची मान्यता घेऊ या.

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

महापालिका डेब्रीज उचलत नाही. डेब्रीज उचलण्याची जबाबदारी बांधकाम आणि जो काम करतो त्याची असते.

**जयंतीलाल पाटील :-**

मा. सभापती साहेब, माशाचा पाडा येथे अनधिकृत बांधकाम चालू आहेत. त्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही. मी पत्रव्यवहार करुनसुध्दा मला अधिकाऱ्यांचा काही जबाब आला नाही.

**मा. सभापती :-**

कार्यक्रम लावलेला आहे. बंदोबस्त मिळाल्यावर कारवाई करण्यात येईल. सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ दु. १२.२० वा.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका